FORM-1A 0058153 N.C.R.B.

## पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station लाप्रवि, पहिली खबर क्र. FIR No. 05, वर्ष Year 2024, दिनांक Date 21/02/2024

2. (i) अधिनियम Act प्रतिबंधक भ्रष्टाचार अधिनियम 1988, कलमे Sections 7
(ii) अधिनियम Act भा.द.वि., कलमे Sections 201
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day मंगळवार तारीख पासून Date from 20/02/2024 वेळ Time 12:00 तारीख पर्यंत Date to 21/02/24 वेळ Time

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 20/02/2024 वेळ Time

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. तारीख Date 21/02/2024 वेळ Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा 30 कि.मी. चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र.
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name सह दुय्यम निबंधक वर्ग-2, यांचे कार्यालय कुर्ला-4 ठिकाणाचे नंबर No. if any गल्ली Ward रस्त्याचे नाव Name of road

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place मुंबई उपनगर जिल्हा गाव Village पोस्ट Post मुलुंड तालुका Taluka कुर्ला (प) मुंबई जिल्हा Dist. राज्य State

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station तालुका Taluka जिल्हा Dist. राज्य State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name आश्विन एकनाथ गुरव (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name एकनाथ गुरव

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 33 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9359620931

(e) पारपत्र क्रमांक Passport No. दिल्याचा दिनांक Date of Issue दिल्याचे ठिकाण Place of Issue (f) व्यवसाय Occupation

(g) धर्म Religion हिंदू, जात Caste, जनजात Sub-Caste

(h) पत्ता Address : गल्ली / सर्व्हे नं. Ward रुम नं. 240, घर / नाव नं. House/Name No. लक्ष्मी निवास चाळ, फोन / मो. नं. Phone/M. No. पॅन नं. PAN No. अन्टॉप हिल, व्होटर्स नं. Card No. चर्च जवळ

रस्त्याचे नाव Road सायन कोळीवाडा, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest Identifiable place मुंबई - 400037 गाव Village पोस्ट Post पो. स्टे. P. Stn.

तालुका Taluka जिल्हा Dist. राज्य State सध्याचा पत्ता Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

① संजय मुजाजीराव घोडजकर वय 52 वर्षे, सह दुय्यम निबंधक वर्ग-2, कुर्ला-4, मुंबई उपनगर जिल्हा.
② दिपा अर्जुन गुजरे वय 41 वर्षे, वरिष्ठ लिपिक, सह दुय्यम निबंधक वर्ग-2, कुर्ला-4, मुंबई उपनगर जिल्हा

Y.P.P.-3,200 Bk.-(25×6=150 Lvs)-3-2021-PA3-(K) 347

③ सिध्देश विकास मोरे, वय 32 वर्षे, संगणक चालक (खाजगी इसम) सह निबंधक वर्ग-2, कुर्ला-4, मुंबई उपनगर जिल्हा.

Scanned with OKEN Scanner

फिर्याद,

यातील फिर्यादी आश्विन एकनाथ गुरव वय 33 वर्षे यांचा स्वतंत्र कागदावर संगणकावर टंकलिखीत केलेला जबाब हिच गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात यावी

समक्ष

Jadhav
विद्या जाधव
पोलीस निरीक्षक
भ्रष्टाचार प्रतिबंधक विभाग
वरळी, मुंबई

[signature]

Scanned with OKEN Scanner

फिर्यादी दि. २१/०२/२०२४

श्री. अश्विन एकनाथ गुरव, वय ३३ वर्षे, धंदा – नोकरी, रा.ठि. रूम नंबर २४०, लक्ष्मी निवास चाळ, जय महाराष्ट्र नगर, कोकरी आगार, अँन्टॉप हिल चर्च, सायन कोळीवाडा, मुंबई ४०००३७. मो.क्र. ९३५९६२०९३१.

---

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर मागील ४ वर्षापासून कुटुंबियासह भाडेतत्वावर रहात आहे. वर नमुद पत्त्यावर सध्या माझ्यासोबत माझे आईवडील, भाऊ आशिष व त्याची पत्नी अपर्णा असे राहतात. मी ' सावंत असोसिएट ' मुलुंड पश्चिम, मुंबई या कायदेशीर सल्लागार संस्थेत नोकरीस आहे. ' सावंत असोसिएट ' हि कंपनी श्री. निलेश सहदेव सावंत यांनी स्थापित केली असून सदर कंपनीच्या मार्फतीने दस्त नोंदणी, अभिहस्तांतरण, अधिकार अभिलेखात नाव दाखल करणे व इतर प्रकरच्या नोंदणी करण्याचे काम केले जाते. सदर कंपनीमध्ये मी डेटा एन्ट्री, दस्त नोंदणी करणे, सह दुय्यम निबंधक यांच्या कार्यालयाशी निगडित कामे करतो.

दिनांक ०२/०२/२०२४ रोजी श्रीमती स्वाती दिनेश पवार यांनी त्यांचे नावे खरेदी दस्ताची नोंदणी करण्याकरीता त्यांचे विनंती पत्र व आवश्यक असलेली कागदपत्रे आमच्या ऑफीसमध्ये आणुन दिली. दि. ०७/०२/२०२४ रोजी श्रीमती स्वाती दिनेश पवार यांनी सदर दस्ताचे मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क असे मिळुन रु. २८,०५,०००/– ऑन लाईन पध्दतीने भरणा केले. दि. ०८/०२/२०२४ रोजी मी सदर दस्त हाताळणी फी म्हणून रु. ८२०/– ऑनलाईन पध्दतीने भरले. त्यावेळेस मला दस्त नोंदणी करण्यासाठी सह दुय्यम निबंधक वर्ग २, कुर्ला ४, मुलुंड पश्चिम, मुंबई या कार्यालयात दिनांक १५/०२/२०२४ रोजी १४.०० वा. ची वेळ मिळाली.

दिनांक १४/०२/२०२४ रोजी १७.३० वा. चे दरम्यान मी वर नमुद दस्ताची नोंद करण्याकरीता आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पडताळणी करण्याकरीता सह दुय्यम निबंधक वर्ग २, कुर्ला ४, मुलुंड पश्चिम, मुंबई या कार्यालयात गेलो. त्यावेळेस मी कार्यालयातील लोकसेविका श्रीमती दिपा गुजरे, पद – वरिष्ठ लिपीक यांना भेटून कागदपत्रे दाखविली असता, लोकसेविका श्रीमती गुजरे यांनी सदर काम करून देण्याकरीता माझेकडे रूपये ५,०००/– इतक्या लाचेची मागणी केली.

त्यानंतर दिनांक १५/०२/२०२४ रोजी १४.०० वा. मी कागदपत्रांसह माझे कंपनीचे वकील श्री रितेश दत्ताराम केनी, दस्त लिहून देणारे – एस.एम.एफ.जी. कंपनीचे मॅनेजर श्री हरप्रित सिंग पुरेवाल व दस्त लिहून घेणारे – श्रीमती स्वाती दिनेश पवार यांचे सह, सह दुय्यम निबंधक वर्ग २, कुर्ला ४, मुलुंड पश्चिम, मुंबई या कार्यालयात गेलो. सदर ठिकाणी कार्यालियातील लोकसेवक श्री संजय घोडजकर, पद – सह दुय्यम निबंधक वर्ग २ यांनी दस्त नोंदणी केली. दस्त नोंदणीचे काम झाल्यानंतर दस्त लिहून घेणारे – श्रीमती स्वाती दिनेश पवार यांनी सह दुय्यम निबंधक वर्ग २, कुर्ला ४, मुलुंड पश्चिम, मुंबई यांचे नावे दिनांक १५/०२/२०२४ रोजी केलेले त्यांचे मुळ दस्ताचे कागदपत्रे माझे ताब्यात मिळावी याबाबतचे श्रीमती स्वाती पवार यांचे सहीचे माझे नावाचे अधिकार पत्र मला देवून ते व दस्त लिहून देणारे श्री पुरेवाल कार्यालयातून निघून गेले. त्यानंतर मी व वकील श्री केनी दस्ताचे मुळ कागदपत्रे घेण्यासाठी कार्यालयात थांबून राहीलो.

त्यानंतर मी कार्यालयातील लोकसेवक श्री संजय घोडजकर यांचेकडे जावून दस्त नोंदणीचे मुळ कागदपत्रे मागितले असता, त्यावेळेस त्यांनी मला दस्ताची स्कॅनिंग करणे बाकी असून सदर दस्ताची स्कॅनिंग करून देण्याकरीता व मुळ दस्ताची प्रत देण्याकरीता लोकसेवक श्री संजय घोडजकर यांनी माझेकडे सदर शासकीय कामाकरीता रूपये २५,०००/– स्वत:साठी व रूपये ५,०००/– त्यांचे कार्यालयातील वरिष्ठ लिपीक श्रीमती दिपा गुजरे यांचेसाठी असे एकुण रूपये ३०,०००/– लाचेची मागणी केली.

सह दुय्यम निबंधक वर्ग २, कुर्ला ४, मुलुंड पश्चिम, मुंबई या कार्यालयातील सह दुय्यम निबंधक वर्ग २ श्री. संजय घोडजकर व वरिष्ठ लिपीक श्रीमती दिपा गुजरे यांना लाचेची रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने मी,

Scanned with OKEN Scanner

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे दिनांक २०/०२/२०२४ रोजी समक्ष हजर राहून लाप्रवि कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे पो.नि. विद्या जाधव यांनी सह दुय्यम निबंधक वर्ग २, श्री. संजय घोडजकर व वरिष्ठ लिपीक श्रीमती दिपा गुजरे हे लाचेची मागणी करीत असल्याबाबतचा तक्रार अर्ज स्वहस्ताक्षरात लिहुन घेऊन त्यावर माझी सही घेतली. सदरवेळी सपोआ उमेश पाटील हे लाप्रवि कार्यालयात हजर होते. त्यानंतर दोन शासकिय पंचांना पाचारण करून त्यांची माझेशी ओळख करून दिली. पो.नि. विद्या जाधव यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो.नि. विद्या जाधव यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पो.नि. विद्या जाधव यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला. पो.नि. विद्या जाधव यांनी माझे तक्रार अर्जावर लगेच कारवाई करण्यात येईल असे मला सांगितले. पो.नि. विद्या जाधव यांनी दिनांक २०/०२/२०२४ रोजी पंचांसमक्ष सह दुय्यम निबंधक वर्ग २, कुर्ला ४, मुलुंड पश्चिम, मुंबई येथील लोकसेवक यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

पो.नि. विद्या जाधव यांनी माझी पडताळणी पथकाची ओळख करून देवून ला.प्र.वि. कार्यालयातून पोलीस पथकासह निघून नाहूर रेल्वे स्टेशन पुर्व, मुंबई येथे थांबलो. त्यानंतर मला सपोआ उमेश पाटील यांनी सह दुय्यम निबंधक श्री. संजय घोडजकर व वरिष्ठ लिपीक श्रीमती दिपा गुजरे यांच्या सह दुय्यम निबंधक वर्ग २, कुर्ला ४, मुलुंड पश्चिम, मुंबई येथील कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून माझे शर्टाचे आतील बनियनला लावून पंच श्री. दिनानाथ शिंदे यांचे सह पाठविले. लोकसेवक संजय घोडजकर व श्रीमती दिपा गुजरे यांची भेट झाली. त्यावेळी लोकसेवक घोडजकर यांन ापंच श्री. शिंदे यांना कार्यालयाच्या बाहेर थांबण्यास सांगितले. त्यावेळी लोकसेवक श्रीमती गुजरे यांचेशी कामासंदर्भात चर्चा झाली. चर्चेदरम्यान लोकसेवक श्रीमती गुजरे यांनी यापुर्वी दि. १४/०२/२०२४ रोजी मागितलेली लाचेची रक्कम रू. ५,०००/– बाबत माझेकडे '' पहिल कधी '' अशी विचारणा केली. त्यावेळी मी '' करतो काय तरी, कमी करा ना, तुम्ही सांगा काय तरी '' अशी त्यांना विनंती केली त्यावेळी त्यांनी लोकसेवक घोडजकर यांचेशी बोलण्यास मला सांगितले.

त्यानंतर मी लोकसेवक संजय घोडजकर यांची भेट घेवून त्यांचेबरोबर माझे कामासंदर्भात चर्चा केली असता चर्चेदरम्यान लोकसेवक घोडजकर यांनी '' आशिर्वाद मिळेल पण ते आशिर्वाद देवाला मागताना नैवैदय ठेवायला लागतय ... काय तुला आशिर्वाद नाय माझा '' असे सांगितले. त्यानंतर मी लोकसेवक घोडजकर यांना '' अहो महत्वाचा प्रसाद आहे पण मी काय म्हणतो.. आता जरा काहीतरी मला एक सांगा... आपलं मला... डॉक्युमेंट घ्यायला येतो लगेच '' त्यावेळी लोकसेवक घोडजकर यांनी '' जा घेवून ये जा.. अॅन्टी करप्शनला जावून येवू नको म्हणजे झालं '' असे म्हटले. त्यावेळी मी त्यांना '' चोवीस पर्यत करु सर.. चोवीस हजार '' असे म्हटले. त्यावेळी त्यांनी मला मानेने इशारा करुन मुक संमती दर्शविली.

त्यानंतर मी लोकसेवक श्रीमती गुजरे यांना भेटलो असता त्यानी मला विचारले '' झाले तुझ बोलण.. झाला का '' त्यावेळी मी त्यांना सांगितले '' चोवीस बोलले ... चोवीस हजार '' त्यावेळी लोकसेवक गुजरे यांनी विचारले की '' कोणाचे .... त्यांचे... पंचवीस सांगितले होते ना ... तुला... '' त्यावेळी मी त्यांना सांगितले '' आता काय करणार.. काहितरी आम्हाला पण प्रसाद पाहिजे कि नको..'' त्यावेळी लोकसेवक गुजरे यांनी '' हा... आणि मग ते तू इथे मध्ये '' असे विचारले. त्यानंतर मी लोकसेवक गुजरे यांना '' मग येवू का विथड्रॉ करुन... विथड्रॉ करुन येतो... रेडी होईल आहे ना '' असे म्हणालो

त्यानंतर मी व पंच श्री. शिंदे नाहूर रेल्वे स्टेशन पुर्व येथे उभ्या असलेल्या पोलीस वाहनाजवळ आलो. सपोआ उमेश पाटील यांनी व्हाईस रेकॉर्डर काढले. त्यावेळी पो.नि. विद्या जाधव यांनी झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. लोकसेवक सह दुय्यम निबंधक वर्ग २, श्री. संजय घोडजकर व वरिष्ठ लिपीक श्रीमती दिपा गुजरे यांनी पडताळणी दरम्यान लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने

Scanned with OKEN Scanner

व लोकसेवक यांना लाचेची रक्कम तात्काळ दयायची असल्याने त्वरीत सापळा कारवाई करावयाची आहे असे पो.नि. विद्या जाधव यांनी सांगितले. त्याप्रमाणे मला सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर माझे कडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. २९,०००/– (रू. ५००/– दराच्या ५८ भारतीय चलनी नोटा) स्वत:चे ताब्यात घेतली. सदर नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. त्यावेळी पो.नि. विद्या जाधव यांनी सांगितले की, अंधार केल्यानंतर अल्ट्राव्हॉयलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता अँथ्रासीन पावडर हिरवट रंगाची दिसते. पो.नि. विद्या जाधव यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला माझे डाव्या हाताचे शर्टाचे बटन काढून शर्टाचा हात फोल्ड करून पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

त्यानंतर पोलीस वाहनात पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस पो.ह.चालक श्री. चिंचोलकर यांनी अँथ्रासीन पावडर लावली. सदर लाचेच्या रकमेपैकी लोकसेवक घोडजकर यांना देण्यात येणारे रु. २४,०००/– व लोकसेवक श्रीमती गुजरे यांना देण्यात येणारे रु. ५,०००/– असे व्यवस्थित घडी करुन माझे पॅन्टच्या समोरील डाव्या खिशात पो.ह. चालक श्री. चिंचोलकर यांनी ठेवली. त्यानंतर सपोआ पाटील यांनी माझे शर्टाचे आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून तो चालू करून पंच श्री. शिंदे यांचेसह सापळा कारवाईकरीता लोकसेवक श्री. घोडजकर व श्रीमती गुजरे यांचे सह दुय्यम निबंधक वर्ग २, कुर्ला ४, मुलुंड पश्चिम, मुंबई येथील कार्यायात पाठविले. माझे पाठोपाठ पोलीस पथक काही अंतर ठेवून होते. मी, पंच श्री. शिंदे यांचे सोबत लोकसेवक श्री. घोडजकर व श्रीमती गुजरे यांच्या कार्यालयात गेलो. मी लोकसेवक घोडजकर यांच्याजवळ जावून माझे कामाबाबत विचारणा केली असता त्यांनी माझे सोबत आलेल्या पंच श्री. शिंदे यांचेकडे संशयाने बघून आंम्हाला बाहेर जाण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच श्री शिंदे कार्यालयाबाहेर असलेल्या नर्सरीजवळ आलो. तेथे हजर असलेल्या सपोआ पाटील यांनी माझे व्हाईस रेकॉर्डर काढले. पो.नि. विद्या जाधव यांनी माझेकडे विचारणा केली असता मी लोकसेवक घोडजकर यांना पंचाचा संशय आला असावा म्हणून त्यांनी आंम्हाला कार्यालयाबाहेर जाण्यास सांगितले.

त्यानंतर पो.नि. विद्या जाधव यांनी लोकसेवक घोडजकर यांना पंचाचा संशय येवू नये म्हणून मला एकटाच लोकसेवक यांना लाचेची रक्कम देण्यास सांगितले. त्यावेळी सपोआ उमेश पाटील यांनी माझे शर्टाचे आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून तो चालू केला. मी लोकसेवक यांना भेटण्यास त्यांचे कार्यालयात गेलो. मी लोकसेवक घोडजकर यांना भेटलो असता त्यांनी " पहिले पैसे दे चल " असे म्हटले. त्यावर मी " पैसे.." असे म्हटले. त्यावेळी लोकसेवक घोडजकर यांनी " हा दे चल.. दे दे.. जेवढे आहेत तेवढे दे.. ध्वजाच्या निधीचे पैसे आहेत तेवढे दे ना.. ध्वजाच्या निधीचे पैसे आहेत ते... हा.. ऐ ठेव " त्यावेळी मी " इथे ठेवू .. चोवीस हजार ..." असे म्हणून माझे पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम रु. २४,०००/– त्यांचे टेबलवर ठेवली. त्यावेळी लोकसेवक घोडजकर यांनी सदरचे पैसे ताब्यात घेवून त्यांचे टेबलचे ड्रॉव्हरमध्ये ठेवले.

त्यानंतर मी लोकसेवक श्रीमती गुजरे यांचेकडे लाचेची रक्कम देण्यास गेलो असता त्या सदर ठिकाणी दिसून आल्या नाहीत. म्हणून मी लोकसेवक यांच्या कार्यालयाच्या बाहेर येवून सापळा पथकास दिसेल अशारीतीने माझे डाव्या हाताचे शर्टाचे बटन काढून शर्टाचा हात फोल्ड करून सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने कार्यालयात येवून लोकसेवक घोडजकर यांस पकडले. पो.नि. विद्या जाधव यांनी लोकसेवक घोडजकर यांना दिलेल्या लाचेच्या रकमेबाबत विचारणा केली असता त्यांनी लाचेची रक्कम त्यांचेजवळ नसल्याचे सांगितले. त्यावेळी सापळा पथकाने लोकसेवक यांची अंगझडती घेतली असता लाचेची रक्कम मिळुन आली नाही. लोकसेवक घोडजकर यांच्या कार्यालयीन टेबलच्या ड्रॉव्हरची झडती घेतली असता त्यामध्ये नोटांचे बंडल मिळुन आले. त्याबाबत लोकसेवक घोडजकर यांचेजवळ विचारणा केली असता त्यांनी सदरची रक्कमेबाबत उडवाउडवीची उत्तरे दिली. पो.नि. विद्या जाधव यांनी सापळा पथकाकडुन अल्ट्राव्हॉयलेट दिव्याखाली लोकसेवक घोडजकर यांचे हाताचा, टेबलची पाहणी केली असता त्यावर हिरवट रंगाची पावडर दिसून आली. त्यानंतर

Scanned with OKEN Scanner

लोकसेवक यांच्या टेबलमधील ड्रॉव्हरची अल्ट्राव्हॉयलेट दिव्याखाली पाहणी केली असता ड्रॉव्हरमधील नोटांचे बंडलवर हिरवट रंगाची पावडर दिसून आली.

त्यानंतर लोकसेवक यांच्या कार्यालयाबाहेरील सी.सी.टी.व्ही. फुटेज तपासले असता इसम नामे सिध्देश मोरे हा संशयीत रित्या पळुन जाताना मिळून आला. त्याची अंगझडती घेवून अल्ट्राव्हॉयलेट दिव्याखाली पाहणी केली असता त्याचे पॅन्टच्या पुढील उजव्या खिश्यावर हिरवट रंगाची पावडर दिसून आली. सदरबाबत त्यास विचारणा केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली.

श्रीमती स्वाती दिनेश पवार यांनी सह दुय्यम निबंधक वर्ग २, कुर्ला ४, मुलुंड पश्चिम, मुंबई यांचे कार्यालयात नोंदणी केलेल्या मुळ दस्ताचे कागदपत्रे माझे ताब्यात देण्याकरीता सह दुय्यम निबंधक श्री. संजय घोडजकर व वरिष्ठ लिपीक श्रीमती दिपा गुजरे यांनी माझेकडे दि. २०/०२/२०२४ रोजी अनुक्रमे रू. २४,०००/– व रु. ५,०००/– लाचेची मागणी केली. सह दुय्यम निबंधक श्री. संजय घोडजकर यांनी त्यांचे हिश्याची लाच रक्कम रु. २४,०००/– स्विकारुन पुरावा नष्ट करण्याच्या इरादयाने लाचेच्या रकमेची विल्हेवाट लावली. सदर पुरावा नष्ट करणेकामी खाजगी इसम सिध्देश मोरे याने सहकार्य केले म्हणून लोकसेवक सह दुय्यम निबंधक श्री. संजय घोडजकर, खाजगी इसम सिध्देश मोरे व वरिष्ठ लिपीक श्रीमती दिपा गुजरे यांनी लाचेची मागणी केली म्हणून त्यांचेविरुध्द माझी कायदेशीर तक्रार आहे. तसेच माझे लोकसेवक श्री. घोडजकर व श्रीमती गुजरे यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून ती मी वाचून पाहिली असता ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( विद्या जाधव ),
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ पडताळणी झाल्यानंतर गुन्हा नोंद

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

—

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ —

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........ —

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद ता. वेळ व ठिकाणी यातील आलोसे (1) व (2) यांनी त्यांचे कार्यालयात नोंदणी केलेल्या मुळ दस्ताचे कागदपत्रे फि. यांचे ताब्यात देण्याकरीता आलोसे क्र (1) यांनी रु 24000/- लाचेची मागणी केली व आलोसे क्र (2) यांनी रु 5000/- लाचेची मागणी केली तसेच आलोसे (1) यांनी फि. यांचेकडुन रु 24000/- लाचेची रक्कम स्विकारुन पुरावा नष्ट करण्याच्या इराद्याने लाचेच्या रक्कमेची विल्हेवाट लावली. सदर पुरावा नष्ट करणेकामी खाजगी इसम आरोपी क्र (3) याने सहकार्य केले म्हणून आलोसे क्र (1), (2) व (3) यांचे विरुद्ध कलम 7 भ.प्र.अधि. 1988 सह कलम 201 भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरुन कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

विद्या नितीन जाधव, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. वरळी, मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन........, जिल्हा........, राज्य........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)........ Rank........ No........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to........ (3) Transferred to P. S. ........ District........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name विद्या नितीन जाधव

पदनाम Rank पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. मुंबई

तपासिक अं. चा कोड क्र. ........

Posting

Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख........

1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

**Attachment to item 7 of First Information Report**

Scanned with OKEN Scanner